**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in

फोन नं 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. – ससं/उशि/पुवि / मुलींना मोफत शिक्षण/ दिनांक : 18.06.2025

**परिपत्रक**

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा 50 टक्के ऐवजी 100 टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ : -
1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ. 2024/ प्र.क्र. 105/ तांशि-4 दि. 08.07.2024.
2. शासन परिपत्रक क्र. शिष्यवृ – 2024/ प्र.क्र. 207 / तांशि – 4, दि. 19.07.2024
3. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं / शिष्यवृत्ती / मु. मो. शि . E – 971006 दि. 18.06.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. 08.07.2024 नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS), समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), इतर मागास प्रवर्गातील (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या 50 टक्के ऐवजी 100 टक्के लाभ मंजूर करण्यात आलेले आहे. याबाबत या परिपत्रकाद्वारे सर्व शासकीय, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित ( टप्पा अनुदान ) व कायम विना अनुदानित महाविद्यालये यांना कळविण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांनीकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. संबधित महाविद्यालय / संस्था यांनी जर विद्यार्थीनींकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास सदर रक्कम विद्यार्थीनींना त्वरीत परत करण्यात यावी. तसेच

याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास सहसंचालक कार्यालय आणि विद्यापीठा मार्फत त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

सन 2025-26 या शैक्षणिक वर्षामध्ये शासन निर्णय दिनांक 8.7.2024 च्या प्रभावी अंमलबजावणी करीता मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना सर्व स्तरावरील विद्यार्थिनी पर्यंत पोहोचेल या साठी अर्ज करणेसाठी खालील बाबींचे मार्गदर्शन करावे.

1.विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरताना उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला इ. कागदपत्रे आवश्यक असतात.

2. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांचा वापर करुन अर्ज भरता येतो.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होणेसाठी त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्नित करणे अनिवार्य आहे.

3. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी शर्ती, देय लाभ या सर्व बाबींचे योग्य रित्या अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

4. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्ण पणे अचूक ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

5. ऑनलाईन अर्ज भरताना कोणत्याही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

**महाविद्यालयांनी करावयाची मदत / मार्गदर्शन**

1. शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयांनी संगणक, प्रिंटर, इंटरनेट इत्यादी सेवा नि : शुल्क उपलब्ध करुन द्यावे.

2. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे ( उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ. ) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार / उपविभागीय कार्यालयामार्फत महाविद्यालयामध्ये शिबिर आयोजित करण्यात यावेत.

3. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होणेसाठी त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्नित करणे अनिवार्य आहे. बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्नीकरणासाठी बँकेसोबत संपर्क करुन बँकेच्या शाखा प्रमुख / अधिकाऱ्यांमार्फत महाविद्यालयामध्ये बँक खात्यासोबत आधार क्रमांक संलग्नीकरणाकरीता शिबिर आयोजित करावेत.

4. महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली ( अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार – अनुदानित / विना अनुदानित , अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती ( Admission Details ), टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजी पूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.

5. महाविद्यालयाच्या लिपीकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जांवर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back ) करावी. महाविद्यालयाच्या लिपीकांनी मंजूर ( Approve ) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीन वर पाठवावे.

6. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपीकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने ( Approve / Reject / Sent Back ) कार्यवाही करावी.

7. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्र उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबंधित विभागाकडे विहित कालमर्यादेत सादर करावीत.

8. विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

9. विद्यार्थीनींना, मुलींना मोफत शिक्षण योजनेची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांकडून पात्र योजनेसाठी जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणतीही विद्यार्थीनी सदर शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच याबाबत

केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाली किंवा कसे याबाबत सर्व महाविद्यालयांनी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच मुलींना मोफत शिक्षण योजनेची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी सदर योजनेची सर्व साधारण माहिती सर्व विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था यांनी त्यांचे संकेतस्थळ / दर्शनी भागात नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन महाविद्यालयात प्रवेशित सर्व विद्यार्थीनींना सोशल मिडीयाद्वारे या योजनेबाबत जागरुकता निर्माण करावी.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 19-06-2025 17:48:11

**(डॉ. अशोक उबाळे )**
सहसंचालक , उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 16 यांना माहितीस्तव सविनय सादर.